MHJN020021832018

भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.१८९/२०१८
शामराव काळे व इतर वि. शासन व इतर
CNRMHJN020021832018

## निशाणी क्रमांक १३ वरील आदेश

सदरचा अर्ज मयत अर्जदार क्र.४ च्या वारसांतर्फे भूसंपादन निर्देशन अर्ज अर्जदाराच्या विरुध्द अबेट झाल्याचा हुकूम बाजूला होऊन मिळणेकामी दाखल केला आहे.

२) अर्जातील कथने थोडक्यात पुढील प्रमाणे –

भूसंपादन निर्देशन अर्जातील मुळ अर्जदार क्र.४ मयत झाला आहे. जमीन संपादन झाल्यानंतर अर्ज जिल्हाधिकारी, जालना यांचेकडून सन २०१८ साली दाखल झाला. त्यापुर्वी सन २००६ मध्ये अर्जदार क्र.४ मयत झाला. परंतु, मुळ अर्जदार क्र.४ चे विरुध्द भूसंपादन अर्ज अबेट झाला आहे. सदरचा अबेट झाल्याचा आदेश बाजूला होऊन मिळण्याची मागणी मयत अर्जदार क्र.४ च्या वारसांतर्फे प्रतिज्ञापुर्वक केली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) सामनेवाल क्र.१ तर्फे सदर अर्जास अर्जावरच आपले म्हणणे दिले आहे.

अर्जातील सर्व विरोधी कथने सामनेवाल क्र.१ ने नाकारली आहेत. उशीराने अर्ज दिला आहे. त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा.

४) मयत अर्जदार क्र.४ चे वारस व सामनेवाल क्र.१ तर्फे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) सदरच्या अर्जानुसार मुळ अर्जदार क्र.४ मयत झाल्यानंतर त्याचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, जमीन संपादन झाल्यानंतर अर्ज जिल्हाधिकारी, जालना यांचेकडून सन २०१८ साली दाखल झाला. त्यापुर्वी सन २००६ मध्ये अर्जदार क्र.४ मयत झाला. परंतु, मुळ अर्जदार क्र.४ चे विरुध्द भूसंपादन अर्ज अबेट झाला आहे. सदरचा अबेट झाल्याचा आदेश बाजूला होऊन मिळण्याची मागणी मयत अर्जदार क्र.४ च्या वारसांतर्फे केली आहे. सामनेवाल क्र.१ तर्फे अर्जास विरोध दर्शविताना अर्जास उशीर झाला असल्याचे स्पष्ट केले आहे.

६) सामनेवाला क्र.१ तर्फे अर्जास दर्शविलेला विरोध विचारात घेता मयत अर्जदार क्र.४ चे वारसांना सदर भूसंपादन अर्ज प्रलंबित असल्याचे ज्ञात नव्हते. तथापि, सदर अर्जाची माहिती मिळालेवर मयत अर्जदार क्र.४ च्या वारसानी सदर अर्ज सादर केला आहे. मयत अर्जदार क्र.४ चे वारसांना अर्ज पुढे चालवण्याचा अधिकार आहे. त्या

करिता मयत अर्जदार क्र.४ चे विरुध्द सदर भूसंपादन अर्ज अबेट झाल्याचा आदेश बाजूला होणे आवश्यक व गरजेचे आहे. त्यासाठी भूसंपादन अर्ज अबेट झाल्याचा आदेश बाजूला करणे न्यायोचित होणार आहे. तसे न झाल्यास मयत अर्जदार क्र.४ चे वारसांचे निश्चितच नुकसान होणार आहे. याकरिता सदरचा अर्ज खर्चाशिवाय मंजूर करण्यात येत आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज निशाणी क्र.१३ खर्चाशिवाय मंजूर करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/–
(एन. एल. येवलेकर)
दिनांकः १९/१२/२०२३ दिवाणी न्यायाधीश व.स्तर
जालना

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे
न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय व.स्तर, जालना
दिनांक : १९/१२/२०२३

सही/–
एम. डी. आढे
लघुलेखक (ग्रेड–३)